दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ४२ ✻ जालना ✻ ✻ शनिवार १२ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी जाहीर ; ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकरी पात्र

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची दुसरी यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत एकूण ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. ही यादी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय प्रसिद्ध करण्यात आली असून, ती संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्येही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १२ लाख ५८ हजार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर १० हजार ११४ कोटी ९० लाख रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामध्ये ७ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २८ कोटी ६० लाख रुपये, तर २४ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ५ हजार ८६ कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत दुसऱ्या यादीतील शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकीची रक्कम तपासून नजीकच्या ‘आपले सरकार सेवा केंद्रा’मध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित (पान ३ वर)




**विभागनिहाय पात्र लाभार्थी**
छत्रपती संभाजीनगर विभाग - १ लाख ९५ हजार ८९९
अमरावती विभाग - ७१ हजार ७९६
नागपूर विभाग - ३४ हजार ५२०
नाशिक विभागं - २५ हजार ४७१
पुणे विभाग - २३ हजार ११७
कोकण विभाग - ४ हजार ८११

## बदनापूर येथे सकल मराठा समाजाचा रास्ता रोको जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा; ‘मागण्या मान्य करा, अन्यथा मुंबईकडे कूच’चा इशारा



बदनापूर / प्रतिनिधी :मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवित बदनापूर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या भूमिकेविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. ‘मागण्या तातडीने मान्य करा, अन्यथा मुंबईकडे कूच!’ असा स्पष्ट इशारा यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या शासनाने लवकरात लवकर मान्य कराव्यात. अन्यथा मनोजदादा जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य राहील आणि त्यांच्या आदेशानुसार संपूर्ण मराठा समाज मुंबईकडे कूच करेल, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. यावेळी ‘आता कुठं जायचं? मुंबईला जायचं!’, ‘एक मराठा, कोटी मराठा’, ‘लढेंगे, जितेंगे’, ‘हम सब जरांगे’ अशा जोरदार घोषणांनी बदनापूर शहरासह महामार्ग परिसर दुमदुमून गेला. घोषणांमुळे आंदोलनस्थळी उत्स्फूर्त आणि आक्रमक वातावरण निर्माण झाले होते. सकल मराठा समाज बदनापूर तालुक्याच्या वतीने करण्यात आलेल्या या रास्ता रोकोमुळे महामार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. ‘निर्णय मनोजदादांचा; साथ मराठा समाजाची!’ आंदोलनादरम्यान उपस्थित समाजबांधवांनी मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेला ठाम पाठिंबा दर्शवित, मनोजदादा जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य राहील. त्यांच्या प्रत्येक निर्णयात सकल मराठा समाज खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा राहील, असा निर्धार व्यक्त केला.

## पोळा सणाच्या दिवशी शेतकऱ्यांचे अनोखे आंदोलन; बैलाच्या पाठीवर ‘कोरडा दुष्काळ जाहीर करा’चा संदेश

परतूर प्रतिनिधी : पोळा सणाच्या निमित्ताने परतूर तालुक्यातील सोयंजना येथील शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची पूजा करून सण साजरा करण्याऐवजी यंदाच्या गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन केले. सोयंजना-शेरोडा परिसरातील शेतकरी बांधवांनी एकत्र येत सोयंजना-शेरोडा-हातडी



रोडवर बैलांसह आंदोलन केले. यावेळी बैलाच्या पाठीवर ‘कोरडा दुष्काळ जाहीर करा’ असा संदेश चित्ररूपाने साकारून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. परतूर तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण



अत्यल्प राहिल्याने खरीप हंगामातील पिकांची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पावसाने मोठा खंड दिल्यामुळे पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी (पान ३ वर)

### जरांगे यांच्यावर सलाईनद्वारे उपचार

जालना : मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले श्री. मनोज जरांगे पाटील यांना काल गुरुवारपासून आज शुक्रवार सकाळपर्यंत चार सलाईनद्वारे उपचार करण्यात असून सकाळपासून त्यांच्या प्रकृतीला आराम पडला असल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून देण्यात आली. श्री. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीवर जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. काल सकाळपासून रात्रीपर्यंत त्यांना तीन सलाईन (पान ३ वर)

## आ.डॉ.संजय कुटे यांचा छत्रपती व्ही. के. फाउंडेशनतर्फे सत्कार

**तेजस्विनी कदम यांनी हस्तमुद्रा व प्रतिमा भेट देऊन केले स्वागत; विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

जालना/प्रतिनिधी : माजी मंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आ. डॉ. संजय कुटे यांचा छत्रपती व्ही. के. फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. फाउंडेशनचे अध्यक्ष विष्णू कदम व ज्योतीराम माने यांच्या पुढाकारातून या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. डॉ. संजय कुटे यांचे विशेष स्वागत करण्यात आले. तेजस्विनी विष्णू कदम यांनी आ. डॉ. संजय कुटे यांची हस्तमुद्रा व आकर्षक प्रतिमा त्यांना भेट देत सन्मान केला. या अनोख्या भेटीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या सत्कार सोहळ्यास आ. नारायण कुचे, भाजपचे शहर



जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती संध्याताई देठे, माजी नगराध्यक्ष सुनील बापू आर्दड, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, युवा नेते अभिमन्यू खोतकर, डॉ. राजन उडान, ज्येष्ठ पत्रकार अंकुश आप्पा देशमुख, नगरसेवक संजय देठे, संभाजी ब्रिगेडचे संतोष गाजरे, विभावरी ताकट, डॉ. संजय लोंढे यांच्यासह राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख मान्यवरांचे छत्रपती व्ही. के. फाउंडेशनचे अध्यक्ष विष्णू कदम व ज्योतीराम माने यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी आ. डॉ. संजय कुटे यांच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती. छत्रपती व्ही. के. फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यामुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## प्लास्टिक फुलांची सर्रास विक्री थांबवा; अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक!

**नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका; आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी**

परतूर/प्रतिनिधी : परतूर शहर व तालुक्यासह जालना जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रातील विविध भागांत प्लास्टिक फुलांची खुलेआम साठवणूक, व्यापार व विक्री सुरू असल्याने नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. प्लास्टिक फुले आरोग्य व पर्यावरणासाठी घातक असल्याने त्यांच्यावर असलेल्या निर्बंधांची प्रभावी अंमलबजावणी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे फुल उत्पादक शेतकर्यांनी केली आहे. नैसर्गिक फुलांचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना लागवड, मजुरी, पाणी व इतर बाबींवर मोठा



खर्च करावा लागतो. मात्र बाजारात प्लास्टिक फुले मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने नैसर्गिक फुलांची मागणी व दरावर परिणाम होत असून उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. प्लास्टिक फुलांचा मोठ्या प्रमाणावर आयातीतून होणारा पुरवठा हा देशातील व राज्यातील फुल उत्पादकांच्या उपजीविकेसाठी चिंतेचा विषय असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गणेशोत्सव, महालक्ष्मी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहीम आगामी गणेशोत्सव व महालक्ष्मी उत्सवाच्या काळात नैसर्गिक फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे या काळात प्लास्टिक फुलांची विक्री वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आतापासूनच बाजारपेठा, दुकाने व साठवणूक केंद्रांची तपासणी करून प्लास्टिक फुलांचा साठा (पान ३ वर)

## धोपटेश्वर येथे बैलपोळ्यानिमित्त मानाच्या बैलांची मिरवणूक



नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : बैलपोळा सणानिमित्त धोपटेश्वर येथे सालाबादप्रमाणे याहीवर्षी मानाच्या बैलाची पारंपरिक पद्धतीने गावभर मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मानाच्या बैलाला आकर्षक सजावट करून ब्रास बँडच्या तालावर वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रमुख मार्गांवरून मिरवणूक जात असताना ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. पारंपरिक पद्धतीने साजरा होणाऱ्या या मिरवणुकीमुळे गावात उत्साहाचे व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ‘बैल हा शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक असून, त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा हा महत्त्वाचा सण मानला जातो. धोपटेश्वर येथील या पारंपरिक मिरवणुकीतून गावकऱ्यांनी आपल्या कृषी संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक केली.

## राधेश्याम बंगाळे यांना नॅशनल आयकॉन २०२६ पुरस्काराने सन्मानित

**शिक्षक दिनानिमित्त आयोजित नॅशनल आयकॉन अवॉर्ड पुरस्कार वितरण सोहळा थाटात संपन्न**

मलकापूर प्रतिनिधी : नशामुक्ती केंद्राचे संचालक राधेश्याम बंगाळे यांना यावर्षीचा अत्यंत मानाचा ✻नॅशनल आयकॉन पुरस्कार २०२६✻ प्रदान करण्यात आला व्यसनमुक्तीच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. प्रेस क्लब ऑफ इंडिया च्या वतीने . शिक्षक दिन व दैनिक समीकरण च्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२६ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साही आणि भावूक वातावरणात हा सोहळा पार पडला. कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशांतभाई वानखेडे शिक्षण सभापती होते मुख्य अतिथी म्हणून धनश्रीताई काटीकर पाटील हिंदी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र अध्यक्ष, प्रा. अनिल खर्चे प्राचार्य वी भी कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय कॉलेज उपस्थित होते, प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर सर्व शिक्षकांचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांचा विशेष शाल, श्रीफळ,




सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना अशांत भाई वानखेडें शिक्षण सभापती म्हणाले, शिक्षक हे समाजाचा कणा असतात. ते केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य आकार देऊन एक सुजाण नागरिक घडवतात. विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करणसिंग सिरसवाल यांनी केले, तर सूत्रसंचालन अनिल केसकर सर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी मानले. राष्ट्रगीताणे कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर येथे लिओ क्लब च्या सहकार्याने ‘शाडू मातीची गणेशमूर्ती’ कार्यशाळा संपन्न;



परतूर (प्रतिनिधी): येथील विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आज, १० सप्टेंबर रोजी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने शाडू मातीचे सुंदर गणपती बाप्पा साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण धडा गिरवला. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) च्या मूर्ती दिसायला आकर्षक वाटत असल्या, तरी त्या पर्यावरणासाठी आणि जलचरांसाठी अत्यंत घातक ठरतात. त्याऐवजी पाण्यात सहज विरघळणाऱ्या शाडू मातीच्याच मूर्तींची प्रतिष्ठापना करणे काळाची गरज आहे. तसेच, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना हक्काचा वाव मिळतो आणि त्यांच्यात निसर्गाविषयी सजगता निर्माण होते, असे मत शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. संदीप बाहेकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा, परतूरच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता शिंदे व लिओ क्लब चे पदाधिकारी प्रमुख पाहुने म्हणून उपस्थित होत्या. कार्यशाळा (पान ३ वर)

### त्यांच्यावर कारवाई करा

मुंबई : दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर तिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब शुक्रवारी सीबीआयने नोंदवला. या प्रकरणात आदित्य ठाकरे, डिनो मोरिया आणि सूरज पांचोली यांच्यासह अन्य संबंधितांवर गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी सतीश सालियन यांनी सीबीआयकडे केल्याचे त्यांच्या वकिलांनी सांगितले. दिशा सालियनची हत्या झाल्याचा दावा तिच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला असून, या प्रकरणाचा आणि अभिनेता सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणाचा संबंध असल्याचाही दिशा सालियनचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. सुरुवातीला स्थानिक पोलिसांनी या घटनेची अपघाती मृत्यू म्हणून नोंद केली होती.

# संपादकीय

## सत्ता बदलाची आशा

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.
नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते.
राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

# आता तरी बेस्टचे अपघात टळतील?



मुंबईकरांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा वाहतूक पर्याय म्हणजे बेस्ट बस सेवा. दररोज लाखो प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचविण्याची जबाबदारी बेस्टवर आहे. मात्र गेल्या काही महिन्यांत बेस्टच्या बस अपघातांच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही केवळ प्रशासनासाठीच नव्हे, तर प्रत्येक मुंबईकरासाठी चिंतेची बाब बनली आहे. या अपघातांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. त्यामुळे एकच प्रश्न उपस्थित होत आहे-आता तरी बेस्टचे अपघात टळतील का? काही वर्षांत बेस्टच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर कंत्राटी बस गाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. आज बेस्टच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० च्या आसपास बस असून कंत्राटी बसची संख्या अडीच हजारच्या आसपास आहे. परिणामी, अपघातांच्या घटनांमध्ये कंत्राटी बसचे प्रमाणही अधिक दिसून येते. याचा अर्थ असा नाही की कंत्राटी चालक निष्काळजी असतात; परंतु वाढती बससंख्या, अनुभवी चालकांचा तुटवडा आणि कामाचा ताण या सर्वांचा परिणाम सुरक्षिततेवर होत असल्याचे चित्र दिसते. कंत्राटदार चालकांना नियुक्तीपूर्वी प्रशिक्षण दिले जाते. वाहन हाताळणी, वाहतूक नियम, प्रवासी सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थिती याविषयी त्यांना मार्गदर्शन केले जाते. तरीही प्रत्यक्ष रस्त्यावरची परिस्थिती प्रशिक्षणापेक्षा अधिक आव्हानात्मक असते. मुंबईतील अरुंद रस्ते, वाढती वाहतूक, सतत बदलणारी सिग्नल व्यवस्था, पावसाळ्यातील खराब रस्ते आणि प्रवासाचा ताण या सर्वांचा सामना करण्यासाठी केवळ प्राथमिक प्रशिक्षण पुरेसे ठरत नाही. सातत्याने पुनर्प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन तितकेच आवश्यक आहे. आज बाजारात प्रशिक्षित बसचालक मिळणे ही मोठी समस्या बनली आहे. जड वाहन चालविण्यासाठी आवश्यक परवाना, अनुभव आणि शिस्त असलेले चालक कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे अनेक कंत्राटदारांना चालकांची भरती करताना अडचणी येतात. चालकांची कमतरता भरून काढण्यासाठी काही वेळा तुलनेने कमी अनुभव असलेल्या चालकांची नियुक्ती करावी लागते. अशा परिस्थितीत अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, बेस्टचे कायमस्वरूपी चालक अनुभवी आणि कुशल मानले जातात. मात्र त्यांचे वेतन, सेवा अटी आणि इतर खर्च कंत्राटी चालकांच्या तुलनेत अधिक असल्याने कंत्राटदारांसाठी त्यांची नियुक्ती आर्थिकदृष्ट्या अवघड ठरते. परिणामी, अनुभवी चालकांची कमतरता अधिक जाणवू लागते. हा प्रश्न केवळ कंत्राटदारांचा नसून संपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत घडलेल्या काही अपघातांच्या प्राथमिक माहितीनुसार अनेक घटनांमध्ये बसमध्ये मोठा तांत्रिक बिघाड आढळून आलेला नाही. काही प्रकरणांमध्ये मानवी चुका, चुकीचा अंदाज, वेगावरील नियंत्रणाचा अभाव किंवा रस्त्यावरील परिस्थितीचे योग्य मूल्यमापन न होणे ही कारणे पुढे आली. याचा अर्थ चालकांचे सातत्यपूर्ण कौशल्यवर्धन आणि मानसिक तयारी यावर अधिक भर देण्याची गरज आहे. आजच्या आधुनिक इलेक्ट्रिक आणि स्वयंचलित प्रणाली असलेल्या बस पारंपरिक डिझेल बसपेक्षा तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत आहेत. अशा वाहनांमधील ब्रेकिंग प्रणाली, ऊर्जा प्रणाली, इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा आणि सुरक्षा वैशिष्ट्यांची माहिती चालकांना सखोलपणे असणे आवश्यक आहे. वाहन चालविण्याचे कौशल्य जितके महत्त्वाचे आहे, तितकीच वाहनाच्या तांत्रिक प्रणालींची समजही महत्त्वाची ठरते. प्रत्येक चालकासाठी नियमित पुनर्प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. आधुनिक ड्रायव्हिंग सिम्युलेटरचा वापर, आपत्कालीन परिस्थितीतील सराव, मानसोपचार तज्ज्ञांकडून तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, थकवा ओळखण्याचे मार्गदर्शन आणि सुरक्षित वाहनचालनावरील कार्यशाळा यामुळे चालकांची कार्यक्षमता वाढू शकते. त्याचबरोबर अनुभवी चालकांकडून नव्या चालकांना मार्गदर्शन करण्याची प्रभावी व्यवस्था उभारणेही आवश्यक आहे. याशिवाय चालकांच्या कामाच्या वेळेवरही लक्ष देणे गरजेचे आहे. सलग दीर्घकाळ वाहन चालविल्यास थकवा वाढतो आणि निर्णयक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे पुरेशी विश्रांती, नियोजित ड्युटी, आरोग्य तपासणी आणि मानसिक स्वास्थ्य याकडेही तितकेच गांभीर्याने पाहिले पाहिजे. सुरक्षित प्रवासाची सुरुवात सुरक्षित आणि सक्षम चालकापासूनच होते. कंत्राटदार, बेस्ट प्रशासन आणि राज्य शासन यांनी संयुक्तपणे चालक प्रशिक्षणासाठी आधुनिक प्रशिक्षण केंद्रे उभारण्याची आवश्यकता आहे. नवीन चालक तयार करणे, विद्यमान चालकांचे कौशल्य वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाची संस्कृती विकसित करणे ही काळाची गरज आहे. अपघातानंतर चौकशी करण्यापेक्षा अपघात होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय अधिक प्रभावी ठरतील. तंत्रज्ञानाचाही अधिक वापर करणे आवश्यक आहे. बसमध्ये चालक सहाय्यक प्रणाली, वेग नियंत्रण यंत्रणा, थकवा ओळखणारी साधने, डॅशकॅम, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुरक्षा प्रणाली आणि नियमित तांत्रिक तपासणी यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यात मदत होऊ शकते. मात्र कोणतेही तंत्रज्ञान सक्षम आणि प्रशिक्षित चालकाची जागा घेऊ शकत नाही. बेस्टची बस ही केवळ एक वाहनसेवा नसून मुंबईची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे प्रत्येक अपघात हा केवळ आकडा नसून एका कुटुंबाच्या आयुष्याशी जोडलेला असतो. सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड परवडणारी नाही. चालकांची कमतरता भरून काढणे, दर्जेदार प्रशिक्षण देणे, तांत्रिक ज्ञान वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाला सर्वोच्च प्राधान्य देणे या उपाययोजना तातडीने राबविल्या गेल्या तर भविष्यातील अनेक अपघात टाळता येऊ शकतात. मुंबईकरांना वेगवान नव्हे, तर सुरक्षित प्रवास हवा आहे. आणि त्यासाठी सक्षम चालक, आधुनिक प्रशिक्षण आणि जबाबदार व्यवस्थापन यांच्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. बेस्टला नेमके हेच करायचे आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून तयारीचा आढावा; गर्दीच्या ठिकाणी २४ तास पोलिसांचा बंदोबस्त

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून तयारीचा आढावा; गर्दीच्या ठिकाणी २४ तास पोलिसांचा बंदोबस्त

पुणे : पुण्यातील गणेशोत्सवासाठी देशभरातून मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम ठेवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी प्रशासनाला दिले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून यंदाचा गणेशोत्सव सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी वातावरणात साजरा करूया, असे आवाहनही त्यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयात गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. शीतल तेली-उगले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महापालिका विनयकुमार चौबे आणि पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. गर्दीच्या काळात अतिरिक्त यंत्रणा तैनात करा गणेशोत्सवासाठी रेल्वे, बस आणि सार्वजनिक वाहतुकीतून मोठ्या संख्येने नागरिक पुण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक रेल्वेगाडीनंतर होणारी गर्दी लक्षात घेऊन संबंधित दिवशी आणि गर्दीच्या वेळेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ व वाहतूक यंत्रणा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी दिल्या. विविध गणेश मंडळांच्या सांस्कृतिक आणि अन्य कार्यक्रमांना हजारो नागरिक उपस्थित राहतात. त्यामुळे अशा ठिकाणी स्वतंत्र वाहतूक व गर्दी व्यवस्थापन करावे. वाहतूक बदल, पर्यायी मार्ग, पार्किंग व्यवस्था आणि गर्दीच्या ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेत देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. २४ तास पोलिसांचा बंदोबस्त गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाचा महत्त्वाचा उत्सव असल्याने महिला, बालके आणि सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. गर्दीच्या ठिकाणी मंगळसूत्र चोरी, पाकीटमारी यांसारख्या बंदोबस्त ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मागील वर्षीच्या अनुभवातून आलेल्या अडचणींचा आढावा घेऊन यंदा आवश्यक सुधारणा कराव्यात आणि सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही सुनेत्रा पवार यांनी सांगितले. वीजपुरवठा आणि विसर्जन व्यवस्थेवर भर गणेश मंडळांसह ग्रामीण भागातील नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश देण्यात आले. विसर्जनाच्या दिवशी विविध विसर्जनस्थळी होणारी गर्दी लक्षात घेऊन विसर्जन कुंड आणि निर्धारित ठिकाणी पुरेशी प्रकाशव्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. विसर्जन सुरू असतानाच संबंधित ठिकाणी सातत्याने स्वच्छता करण्यात यावी, जेणेकरून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. 'परंपरेला साजेसे वातावरण निर्माण करा' लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप दिले. या परंपरेला साजेसे वातावरण निर्माण करून गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा. सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, पारंपरिक पद्धतीला प्राधान्य राहील आणि उच्च न्यायालयाच्या नियमांचे पालन केले जाईल, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले. महापालिकेकडून विविध सुविधा पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्य रस्त्यांवरील खड्डे दुरुस्ती, सुलभ शौचालये, अतिरिक्त प्रकाशव्यवस्था, सार्वजनिक ध्वनिक्षेपक, सीसीटीव्ही सनियंत्रण आणि आपत्कालीन प्रतिसाद पथकांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती दिली. गर्दीच्या ठिकाणी वैद्यकीय पथकेही सज्ज ठेवण्यात आली आहेत. नागरिकांना काही अडचण आल्यास तात्काळ प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन त्यांनी केले. मेट्रोच्या प्रवाशांसाठीही विशेष नियोजन गणेशोत्सवातील वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रोने विशेष नियोजन केले आहे. मंडई स्थानकाचा वापर केवळ बाहेर पडण्यासाठी करावा, तर गणपती दर्शनासाठी येणाऱ्या प्रवाशांनी भूमिगत मार्गावरील कसबा पेठ किंवा स्वारगेट स्थानकांचा वापर करावा, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण पोलिसांनी केलेल्या सुरक्षा तयारीचे सादरीकरणही बैठकीत करण्यात आले. तसेच विविध शासकीय विभागांच्या तयारीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

# पावसाची लपाछपी, शेतकरी मात्र चिंतेत!



महाराष्ट्रात पूर्वी कोकण प्रांत भात पिकात अग्रेसर होता. शालेय पाठ्यपुस्तकात भुगोल शिकताना त्यामध्ये कोकणातील पिकांमध्ये भात अग्रस्थानी असल्याचे सांगितले जायचे. कोकणच्या जनतेच्या खाद्य पदार्थांमध्ये भात आणि मासे हे प्रमुख अन्न म्हटले जायचे. कोकणातील रायगड जिल्हा हा सर्वाधिक भात पिकवणारा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात, नाचणी पिके घेतली जात. गेल्याकाही वर्षांमध्ये शेतीचं स्वरूप बदलले. कोकणातील अनेक कुटुंब नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने कोकण बाहेर नागपूर, नाशिक, पुणे, मुंबई या शहरीभागात वास्तव्याला गेले. कोकणात कायमस्वरूपी रहाणाऱ्यांची संख्या फारच कमी झाली. यामुळे साहजिकच कोकणातील शेतीवर परिणाम झाला. भातशेती करायची तर किमान कुटुंबांतील चार-सहा शेतात काम करणारी माणसं हवीत. शेतात राबणारे हातच कमी झाले. नोकरी-व्यवसायात तरूण शहरांमध्ये गेले आणि थरथरत्या हातांची समाधानी मनाची वृद्ध माणसं गावात आहेत. परंतु त्यांची शेतात काम करण्याची क्रयशक्तीच उरलेली नाही. परिणामी कोकणातील भातशेतीचे क्षेत्र कमी झाले. अर्थात काहींनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत शेती करण्याचा प्रयत्न केला. परंतु पूर्वीप्रमाणे पारंपरिक पद्धतीची शेतीची अवजारे आता दुर्मिळ होत चालली आहेत. जून महिन्याच्या ७ तारखेला मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पावसाचे आगमन होत असे. सुरूवातीच्या काही दिवसांतच पाऊस असा काही बरसायचा की आता पाऊस थांबावा असं शेतकरी म्हणायचा. कोकणातील नदी-नाले, ओहोळ दुथडी भरून वाहायचे. मे महिन्याच्या रणरणता उन्हाळा संपून येणाऱ्या पहिल्या पावसात कोकण हिरवंगार होऊन जायचं. आंबा, काजू, रतांबा आदी फळ पिकांची जोडणी करणारा शेतकरी भात पेरणीसाठी सज्ज असायचा. पावसाचं आगमन कोकणातील शेतकऱ्याला खुणवायचं, भातशेती करणारा शेतकरी किमान वर्षभर कुटुंबाला भात पूरेल अशा पद्धतीने नियोजन करायचा. भात आणि माशांचं कालवण (आमटी) हे प्रमुख अन्न पदार्थ असल्याने भात भरपूर पिकलं की कोकणातील घराघरांत आनंदी वातावरण असायचे. पैशाची श्रीमंती फार नव्हती. कोकणातील शेतकऱ्याच्या गाठीला अधिकचा पैसा नव्हता. जेमतेम मुलांचं शिक्षण दोन वेळचं जेवण मिळतंय याचा कोण आनंद कोकणातील शेतकऱ्याच्या मनात असायचा. घरात वर्षभर खाऊनही भाताची कणगी, मुडी बांधलेली असायची. आता घरात कणगी भरलेलं भात आणि तसा शेतकरी शोधावा लागेल. भाताचा संचय करणारा शेतकरीही आता नाही. असलाच तर रायगड जिल्ह्यातील काही भागात असे शेतकरी असू शकतात. परंतु दक्षिण कोकणात मात्र आता भातशेतीचे क्षेत्र फारच कमी झाले आहे. काही कुटुंबात निष्ठेने, आवड म्हणून आणि कुटुंबाची कोकणची परंपरा म्हणून शेती केली जाते. अशा कुटुंब संस्था आजही एकत्र कुटुंबांचे दर्शन घडवत शेतात राबताना, आनंद घेताना दिसतात. सध्या ऋतुचक्रातील अनियमितता या शेतीच्या आड येऊ लागली आहे. यावर्षी जूनचा पहिला पंधरवडा देखील सुकाच गेला. अखेरीस पाऊस पडला तर पेरणी करावयाची की नाही अशा द्विधा मन:स्थितीत असताना थोडाफार पाऊस पडला त्याचा आधार घेत कोकणातील शेतकऱ्यांनी पेरणी केली. परंतु काही दिवस पावसाने दडी मारल्याने भात पेरणी होऊन देखील भात चांगले उगवेल की नाही याची खात्री उरली नाही. यातच एप्रिल-मे महिन्यात जसा रणरणता उन्हाळा असतो त्यापेक्षाही अधिक उन्हाळा कोकणात जाणवू लागला होता. आता कुठे दोन तीन दिवस पडलेल्या पावसाच्या शिडकाव्याने कोकणातील शेतकरी काहीसा सुखावला, म्हणजे भाताची 'जीव जगवणी' झाली असं त्याला वाटू लागलं. अनेक भागांमध्ये कडक उन्हामुळे शेतामध्ये भेगा पडल्या आहेत. परंतु पावसाच्या थोड्या वेळाच्या हजेरीने या शेतजमिनीला पडलेल्या भेगाही जातील. कोकणातील शेतकरी संततधार पावसाच्या प्रतिक्षेत आहे. सध्या कोकणात पावसाचा लपाछपीचा खेळ सुरू आहे. अशावेळी पूर्वी 'ऊन आणि पाऊस कोल्याचा लगीन' हे गंमतीच आवर्जून म्हटलं जायचं पण आता हे वाक्य उच्चारण्याची हिम्मतही कोकणातील शेतकऱ्यांमध्ये उरलेली नाही. वारंवार गायब होणारा पाऊस बरसावा याच प्रतिक्षेत कोकणातील शेतकरी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# कृष्णेच्या डोहात ८ फूट लांबीच्या मगरीचा वावर; औदुंबर घाटावर भाविकांची गर्दी

सांगली : औदुंबर येथील कृष्णा नदीच्या डोहात सध्या तब्बल ८ ते १० फूट लांबीची मगर वावरत असल्याचे दिसून येत आहे. दररोज सकाळच्या सुमारास ही मगर नदीकाठच्या घाटावर येऊन उन्हात बसत असल्याची माहिती स्थानिक नावाडी नितीन ंगुरव यांनी दिली. त्यामुळे औदुंबरला येणाऱ्या भाविकांना घाटावरून मगरीचे दर्शन होत आहे. ं मगर नेमकी कुठे दिसली?
औदुंबर येथील कृष्णा नदीच्या डोहात या मगरीचा नियमित वावर असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. विशेषतः सकाळच्या वेळी ती घाटाच्या काठावर येऊन उन्हात बसताना दिसते. या परिसरात यापूर्वीही अनेक मगरींचा वावर असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येते.
या ठिकाणी मगरींचा वावर का वाढला?
औदुंबरच्या डोहात मासेमारीला बंदी असल्याने येथे मोठ्या प्रमाणात माशांची पैदास झाली आहे. पाणी स्वच्छ असताना हे मासे घाटावरूनही सहज दिसतात. त्यातच भाविकांकडून प्रसादासह काही वस्तू नदीच्या पाण्यात सोडल्या जात असल्याने माशांना खाद्य उपलब्ध होते. त्यामुळे



नदीतील जैवविविधतेसोबतच मगरींसाठीही पुरेसे खाद्य उपलब्ध होत असल्याचे दिसून येते. छरसींीि चरीलरीं ऋशींिंळींरश्र : नागपूरचा १४५ वर्षांचा अनोखा 'मारबत उत्सव'; जाणून घ्या परंपरा, इतिहास अन् खासियत नागपूर : नागपूर म्हटलं की गणेशोत्सव, ताडोबा आणि रसाळ संत्र्यांसोबतच शहराच्या खास सांस्कृतिक ओळखीचा एक अविभाज्य भाग असलेल्या 'मारबत उत्सवा'ची ही आठवण नदीकाठावर कोणते पक्षी दिसतात?
माशांची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता असल्याने नदीकाठावर विविध पक्ष्यांचाही वावर वाढला आहे. राखी बगळा, खंड्या, ब्राह्मणी घार, पानकावळे आणि रिव्हर टर्न यांसारखे पक्षी या परिसरात नियमितपणे दिसतात. माशांमुळे या पक्ष्यांना नदीकाठावर खाद्य मिळत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.
भाविकांची गर्दी कधी वाढते?
औदुंबर हे प्रसिद्ध श्रीदत्त तीर्थक्षेत्र असल्याने वर्षभर भाविकांची वर्दळ असते. विशेषतः गुरुवार, पौर्णिमा, गुरुपौर्णिमा, दत्तजयंती आणि महाशिवरात्रीच्या काळात येथे मोठी गर्दी होते. या काळात घाटावरून मगरीचा वावर पाहण्याची संधी भाविकांना मिळत आहे. : राखी सावंतविरोधात थेट एनआयएकडे तक्रार; नेमकं प्रकरण काय?
मुंबई : बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' म्हणून ओळखली जाणारी राखी सावंत तिच्या अतरंगी वक्तव्यांमुळे, सोशल मीडियावरील चर्चांमुळे आणि पॅप्ससमोरच्या विविध . भाविकांच्या सुरक्षेसाठी काय उपाय?
मगरीच्या वावरामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन नदीत पोहण्याच्या भागात तारांचे फेन्सिंग आणि जाळी उभारण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्यात न उतरता सुरक्षित अंतरावरून नदीकाठावर मगरीचा वावर पाहता येतो. या घटनेचे वैशिष्ट्य काय?
कृष्णा नदीच्या डोहातील मुबलक मासे, विविध पक्ष्यांचा वावर आणि मगरींची उपस्थिती यामुळे औदुंबरचा हा परिसर स्थानिक जैवविविधतेचे वेगळे चित्र दाखवत आहे. मात्र, मगरीचा वावर लक्षात घेता नागरिकांनी सुरक्षित अंतर राखणे आणि पाण्यात उतरणे टाळणे महत्त्वाचे आहे.

## ऐन सणासुदीच्या दिवसांत प्रवाशांचा खोळंबा, रविवारी 'या' मार्गावर ९ तासांचा ब्लॉक, लोकलसह एक्स्प्रेसही रद्द

पुणे: गणेशोत्सवासाठी जेमतेम काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. नोकरदारवर्ग आता गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाण्यासाठीही रवाना झाले आहेत. ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये मध्य रेल्वेने येत्या रविवारी ९ तासांचा मेगाब्लॉक घेण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे रेल्वे स्थानकातील यार्डामध्ये डी.डी.एस. पॉइंटच्या उन्नतीकरणासाठी रविवारी (१३ सप्टेंबर) नऊ तासांचा पायाभूत सुविधा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे जर तुमचा रविवारी गावी जाण्याचा प्लॅन असेल तर, तुम्हाला त्या दिवशी काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आधीच पुर्वनियोजन करूनच प्रवास करा. रविवारी पुणे रेल्वे स्थानकावर सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे स्थानकातून सुटणाऱ्या लोकल, एक्स्प्रेस आणि मेमू गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी रविवार असल्यामुळे त्या दिवशी अनेक जण घराच्या बाहेर शॉपिंग करण्यासाठी निघतात. त्यामुळे जे शॉपिंग करण्यासाठी, गावी जाण्यासाठी घराबाहेर निघणार आहेत, त्यांना मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. नऊ तासांच्या मेगाब्लॉकच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकल, लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस आणि मेमू गाड्या रद्द केल्या जाणार आहेत. का घेण्यात आला मेगाब्लॉक? पुणे- दौंड विभागातील पुणे यार्डामध्ये डी.डी.एस. पॉइंट क्रमांक २२८ (आय) आणि २२६ (थ्री) बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासोबतच सध्या अस्तित्वात असलेल्या ५२ किलो वजनाच्या रेल्वे मार्गाचे ६० किलो वजनाच्या




मार्गात उन्नतीकरण करण्यात येणार आहे. या महत्त्वाच्या कामासाठी विशेष वाहतूक तसेच वीज ब्लॉक घेण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे. ब्लॉकच्या कालावधीत पुणे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक १, अप मेन लाइन आणि सीएसएमटीकडील डाउन मेन लाइनवरील रेल्वे वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे लोकल, एक्स्प्रेस आणि मेमू गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. कोणत्या एक्स्प्रेस रद्द होणार?
पुणे-तळेगाव- रद्द तळेगाव-पुणे- रद्द पुणे-लोणावळा- रद्द लोणावळा-शिवाजीनगर लोकल- रद्द सीएसएमटी-मुंबई-पुणे डेक्कन एक्स्प्रेस- रद्द पुणे-मुंबई डेक्कन एक्स्प्रेस- रद्द पुणे-दौंड मेमू ट्रेन- रद्द कोणत्या गाड्यांच्या शेवटच्या स्थानकामध्ये बदल केला? जयपूर-पुणे एक्स्प्रेस, नागपूर-पुणे एक्स्प्रेस, अमरावती-पुणे एक्स्प्रेस, मुंबई-पुणे एक्स्प्रेससह काही गाड्या खडकी किंवा हडपसर स्थानकांपर्यंतच चालवण्यात येणार आहे. लोणावळा-पुणे लोकल शिवाजीनगरपर्यंत, बारामती- पुणे मेमू ट्रेन दौंडपर्यंत, पुणे-लोणावळा लोकल शिवाजीनगरपर्यंत, पुणे-जयपूर, पुणे- नागपूर आणि पुणे- मुंबई एक्स्प्रेस खडकी किंवा हडपसर स्थानकांपर्यंतच चालवल्या जाणार आहे. प्रवासापूर्वी वेळापत्रक तपासण्याचं आवाहन मध्य रेल्वेकडून प्रवाशांना करण्यात आलं आहे. आणखी शोधा

पान ४ वरुन

### जादुई नंबरप्लेट

कारवाई केली आहे. व्हिडिओ व्हायरल होताच, आरटीओ पोलिसांनी दखल घेत, सापळा रचून पिंपरी चिंचवडमध्ये सापळा रचून गाडी ताब्यात घेतली आहे. शिवाय, कारचालकाविरोधात एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. ड्रायव्हरवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत बनावटगिरी, फसवणूक आणि इतर संबंधित गुन्ह्यांसाठी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. वाहतूक पोलिसांनी त्या कारची तपासणी केल्यानंतर त्यांना अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. फॉर्च्यूनर चालकाने कारमध्ये, 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रोलर' किंवा कव्हर करणारी विशेष आधुनिक यंत्रणा बसवली असल्याचे उघडकीस आले होते. कार ड्रायव्हिंग करताना एका बटणाच्या सहाय्याने वाहनाची नंबर प्लेट झाकली जाऊ शकते, अशी रचना केली होती. त्यामुळे एक्स्प्रेसवेवरील अत्याधुनिक ट्रॅफिक कॅमेऱ्यांमध्ये वाहनाचा क्रमांक नोंदवला जात नव्हता आणि ई-चलानपासून चालकाचा सहज बचाव होत होता. त्या कार चालकाने ही यंत्रणा पंजाबमधून बसवल्याची माहिती पोलिस तपासामध्ये स्पष्ट केले आहे.

पान १ वरुन पान १ वरुन पान १ वरुन

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

झालेली ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीक कर्जे तसेच पुनर्गठित व फेरपुनर्गठित कर्जांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी महाआयटीची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१ लाख १७ हजार थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटीने संगणकीय प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या १६ लाख ९६ हजार पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केली होती.

### पोळा सणाच्या दिवशी

संकटात ़सापडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने ठोस मदत जाहीर करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी केली. शेतकऱ्यांनी परतूर तालुका सरसकट कोरड्या दुष्काळग्रस्त तालुका म्हणून जाहीर करावा, अशी प्रमुख मागणी केली. तसेच कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये, तर बागायतदार शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १ लाख रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय शासनाने जाहीर केलेल्या पीक कर्जमाफीची पहिली यादी जाहीर झाली असली तरी अनेक पात्र शेतकरी अद्याप कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे पीक कर्जमाफीची दुसरी यादी तात्काळ जाहीर करून पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाल्याने पीक विम्याची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करावी, अशीही मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसताना खरीप हंगामातील नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जाचा भार यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. पोळा हा शेतकरी आणि बैलांच्या नात्याचा महत्त्वाचा सण आहे. याच दिवशी बैलाच्या पाठीवर 'कोरडा दुष्काळ तात्काळ जाहीर करा' असा संदेश लिहून शेतकऱ्यांनी शासनाला आपल्या व्यथा वेगळ्या पद्धतीने पोहोचवण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दुष्काळ जाहीर करावा. सत्तेमध्ये असलेले आणि विरोधक हे दोन्हीही शेतकऱ्यांच्या प्रश्नावरती ब्र काढायला तयार नाहीत. शेतकरी आज आर्थिक संकटात असताना सुद्धा या राज्यामध्ये जातीपातीचे राजकारण करून शेतकऱ्याचा मुद्दा बाजूला ठेवल्या जात आहे. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव राज्य सरकार देत नाही एकीकडे राज्यसरकारने तुटपुंजी कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसले आहेत. सोयाबीन तूर कापूस उडीद मूग यासारखी पिके उध्वस्त झाली आहेत शेतकऱ्यांच्या हाता तोंडशी आलेला घास वरून राजाने गिळंकृत केला आहे.यामुळे शेतकरी खूप मोठ्या संकटात सापडला आहे असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे.  आणि आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही शेतकरी बांधवांनी दिला.
.सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना मंडळ अधिकारी परतुर यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनावरील सह्या
बालासाहेब कराळे,बाबासाहेब ढवळे,दिगंबर नळगे,शंकर नळगे,माऊली भाऊ सोळंकै,मुरलीधर बळीराम ढवळे,मुरलीधर बळीराम ढवळे,उद्धव दौलतराव कराळे,विकासराव नळगे,हरी सोळंके,वैजनाथ देविदास ढवळे,बाळासाहेब कराळे,रवी कराळे,नंदकिशोर बोराडे.यावेळी शेतकरी बांधव उपस्थित होते.

### प्लास्टिक फुलांची

आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, आमदार बबनराव लोणीकर तसेच तालुका कृषी अधिकारी,यांना देण्यात आले आहे. नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी प्लास्टिक फुलांच्या साठवणूक, व्यापार व विक्रीवर प्रभावी नियंत्रण आणण्याची मागणी करण्यात आली यावेळी मोठ्या संख्येने फुल उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

### जरांगे यांच्यावर

आली. काल रात्री ११.३० वाजता श्री. जरांगे यांनी तीव्र डोकेदुखी
आणि मळमळ होत असल्याची तक्रार केली. संयुक्त वैद्यकीय पथकाने तत्काळ तपासणी करून त्यांना औषधे दिली. त्यानंतर देखभालीचा भाग म्हणून पहाटे साडेचारपर्यंत आणखी एक सलाईनद्वारे आयव्ही फ्ल्यूड देण्यात आले. सध्या श्री. जरांगे पाटील यांना कोणतीही तक्रार नसल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली आहे. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, जिल्हा रुग्णालयातील फिजिशियन आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते.

### विवेकानंद इंग्लिश स्कूल

यशस्वी करण्यासाठी विवेकानंद पब्लिक स्कूलचे प्राचार्य विजयकुमार दंदाले, विवेकानंद इंग्लिश स्कूलचे प्राचार्य भालचंद्र महाजन यांच्यासह सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. स्वतः च्या हाताने बाप्पाची मूर्ती साकारण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. शाळेने यापुढेही असे नवनिर्मितीक्षम उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांनी या वेळी केली.

### पर्यावरण शोध ..

गेले गावकरी शहरात
सिमेंटच्या सानिध्यात
जंगले सोडूनि हिरवी
बोनसायच्या शोधात

शहरे होई ऑक्टोफस
सरळ घुसली गावात
सफाचट होती जंगले
रे कु-हाडीच्या घावात

शोधत राहतो पावसा
आता पांढ-या ढगात
पाणी आटता आडात
येणारं कसे पोह-यात

पर्यावरण कागदावरी
निसर्ग रक्षण नावात
प्रगतिगतीच्या शोधात
प्रदुषण शिरले गावात

आपणचं कशी केली
आत्महत्याआत्म घात
पर्यावरणवर झालेला
विसरु न शके आघात

उपाय बेगडी शोधतो
रे निसर्गाच्याविरोधात
निसर्ग जेव्हा क्रोधान्व
दोष सगळा नशिबात

राक्षसापेक्षाही क्रुर ही
कसली माणूस जमात
जग ज्ञेता होऊ पाही
अजून वेगळ्या,भ्रमात

**- हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996

### कोडे ..

पांढरे ढग उगाचंच
वाजवू लागे चौघडे
वेळेवर येई पाऊस
असे क्वचितचं घडे

हवामान खात्याशी
कशास लावे झगडे
वर्तवल्या अंदाजाले
नेहमी पाडतो उघडे

येण्याची फक्त वार्ता
मेघराज का गडगडे
तहानलागली आर्ता
हिंडतात रिकामेघडे

पाऊस का विक्षिप्त
नेहमीचं पडते कोडे
म्हणतो येणारस्वारी
नेमकेतेंव्हाचं कोरडे

मान्सून लांबलाबोले
धारा धुवांधार झोडे
वादळी वारा गोंगावे
उन्मळून पडतीझाडे

नकातवर्तवू भविष्य
चुके पुरते अलिकडे
हळूचंढकलून द्यावी
जबाबदारीपलिकडे

निसर्ग अन् खात्याचे
काय असे बा वाकडे
अंदाजआणि प्रत्यक्ष
उलटे सुलटे आकडे

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
9730306996

### दोष ..

कितीकाही केले तरी
काहीजण देतातदोष
सवय असे जन्मजात
हा त्यांचा नसतो दोष

टिका करणे गुण धर्म
शिव्यानी मिळे संतोष
अटकावकरता त्यांना
अधिकउसळतो जोश

माघार आपण घेताचं
येतो कसला जल्लोष
दुर्लक्ष करुन कार्यकरे
आपल्यामना परितोष

उगाचडिवचून अशास
ओढवून न घ्यावा रोष
समजून घ्यावे कारणा
करता कुणी कंठशोष

सहज मिळेल प्रसिद्धी
चालेलजेवढाव्याक्रोश
विरोध जितका प्रखर
चारित्र्य होणारं सपोश

सांत्वनकरे आधीत्या
करतोयं जो आक्रोश
गुण गान करती भाट
असे उपकारपरामोश

खजील होती मनातून
कळताआहोत निर्दोष
टिकाकार होईसन्मित्र
करे आपला उच्चैर्घोष

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
9730306996

### अभिनंदन ..

असो विजेता कुणी
कर खुले शुभचिंतन
शब्द दोन चार पुरेसे
सफल अभिष्टचिंतन

दिसे मोठेपणआपले
मुक्त मुखे अभिनंदन
कष्ट कितीसे लागती
कर जोडून कर वंदन

दुःखव्यक्त एकांतात
खुशाल करारे रूदन
सर्वां समोर रे निदान
नकोमुळी अधोवदन

का हार पदरी पडली
निवांत करासंशोधन
आपल्याप्रमादावरती
नकोखोटे आच्छादन

निर्णय मान्यतानसता
सकारण द्या आवेदन
विरोध नक्की करावा
पुराव्यांसहीतनिवेदन

अवेळी रे शोक सभा
विफलठरते आक्रंदन
योग्य असूनहीआपले
मातू लागेल रणक्रंदन

सबुरीने मांडा म्हणणे
मिळे शक्त अनुमोदन
आकांडतांडव नसावा
विफल आरण्य रूदन

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
9730306996

### मोकळा श्वास ..

युध्द विराम घोषणेने
सोडला जरा निश्वास
गुद्मरलेली माणूसकी
घेणार मोकळा श्वास

महा सत्ता असूया ही
वेठीस संपूर्ण विश्वास
धाकधुक तशी मनात
ठेवू का खरेचंविश्वास

अडकू पडली जहाजे
नव्याने करती प्रवास
दिल्याशब्दांना आला
विश्वास घातकी वास

बंदिस्त जखडे कणव
दयाप्रेमाचा कारावास
नाती संबंध शोधतात
आपुलकीचा सहवास

आप्तस्वकीयनिवर्तले
घाव असह्य रे जीवास
बे घर ती भाऊ बंदकी
शोधे मिळेकुठे निवास

अर्थव्यवस्था कोलमडे
निघेना गळ्याचा फास
काळजा केल्याजख्मा
खाल्ल्या मीठाने फास

युध्दनिती भाग का हा
अचानक घेतीलं घास
विश्वासमेला पानीपता
हुळहुळे नीत इतिहास

**-हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996..

# प्रारूप मतदार यादीवर दावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

## मतदारांनी यादी तपासूनआवश्यक ते अर्जदाखल करण्याचे आवाहन



जालना/प्रतिनिधी : विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ (SIR) अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांचीप्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.या प्रारूप यादीच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६असा कालावधी देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने नागरिकांना आपले नाव व मतदार यादीतील तपशील तपासून आवश्यक असल्यास विहित नमुन्यात अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठीनमुना क्रमांक ६, नावाच्या समावेशाला आक्षेप घेण्यासाठीनमुना क्रमांक ७, तर मतदाराच्या नोंदीतील दुरुस्ती, मतदार ओळखपत्रातील बदल तसेच दिव्यांग चिन्हांकनासाठीनमुना क्रमांक ८मध्ये अर्ज करता येणार आहे. तसेच मतदारसंघातील अन्य ठिकाणी स्थलांतर झाल्यामुळे पत्त्यात बदल करण्यासाठीही नमुना क्रमांक ८ अंतर्गत अर्जाची सुविधा उपलब्ध आहे. दरम्यान, प्रारूप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करणे, वगळणे किंवा दुरुस्ती करण्यासंदर्भातखोटी माहिती अथवा खोटे घोषणापत्र साद करू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधीलकलम ३१नुसार मतदार यादीच्या तयारी, पुनरीक्षण, दुरुस्ती किंवा नावाचा समावेश-वगळण्यासंदर्भात जाणीवपूर्वक खोटी माहिती अथवा घोषणा करणाऱ्या व्यक्तीसएक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्हीअशी शिक्षा होऊ शकते. प्रारूप मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलांमध्ये काही त्रुटी असल्यास नागरिकांनी मुदतीपूर्वी संबंधित अर्ज दाखल करावेत. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी आणि ड्खठ-२०२६ संदर्भातील दावे-हरकती दाखल करण्यासाठीमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्रयांच्या अधिकृत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# तंबाखू मुक्त पिढीच्या दिशेने जालना जिल्ह्याचे दमदार पाऊल; जिल्ह्यातील १०१ शाळा तंबाखू मुक्त

जालना/प्रतिनिधी : राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम (NTCP) जिल्हा रुग्णालय अंतर्गत जालना जिल्ह्यात ३९;तंबाखूमुक्त शाळा३९; अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, विद्यार्थ्यांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाला शाळांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आजपर्यंत जिल्ह्यातील १०१ शाळांनी तंबाखूमुक्त शाळेचे निर्धारित निकष पूर्ण केले असल्याचे जिल्हा रुग्णालय जालना यांनी कळविले आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये तंबाखूविरोधी विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये तंबाखूमुक्त शाळेसाठी निर्धारित ९ निकषांची पूर्तता करणाऱ्या शाळांचा आढावा घेऊन त्यांना तंबाखूमुक्त करण्यात येत आहे. यासाठी १० ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान प्रथम जिल्हास्तरीय सर्व तालुका शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख व विस्तारअधिकारी यांची कार्यशाळा घेण्यात आली त्यानंतर प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांची कार्यशाळा घेऊन, यामध्ये शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचा वापर व विक्री होणार नाही याची दक्षता, तंबाखूमुक्तीबाबत जनजागृती करणारे फलक, विद्यार्थ्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती,




तंबाखूमुक्तीची शपथ तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचा सहभाग यासारख्या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ३९;तंबाखूला नकार, निरोगी जीवनाला स्वीकार३९; हा संदेश पोहोचविण्यात येत आहे. शाळांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन, जनजागृती कार्यक्रम, शपथविधी तसेच तंबाखूविरोधी संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून हा संदेश त्यांच्या कुटुंबापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावर्षी एप्रिल २०२६ ते आजपर्यंत १०१ शाळा तंबाखूमुक्त करण्यात आल्या असून हा उपक्रम येथेच थांबणार नसून पुढील काळात जिल्ह्यातील आणखी शाळांचा तंबाखूमुक्त शाळा अभियानात समावेश करण्यात येणार आहे. संबंधित शाळांना निर्धारित निकषांची पूर्तता करण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे. तंबाखूचे सेवन सुरू होण्यापूर्वीच त्याला प्रतिबंध करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असून, ३९;तंबाखूमुक्त शाळा – तंबाखूमुक्त परिसर तंबाखूमुक्त पिढी३९; या संकल्पनेच्या दिशेने जालना जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भावी पिढीला व्यसनमुक्त करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# जिल्ह्यात अवैध कारवायां विरोधात धडक मोहीम

**आरटीओ, उत्पादन शुल्क, महसूल व पोलिस विभागाची संयुक्त कारवाईत १०.१६लाखांचा दंड, अवैध दारूसह ट्रॅक्टर जप्त**

जालना : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच अवैध प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागांकडून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. यामोहिमेत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क, महसूल व पोलिस विभागाने विविध ठिकाणी कारवाई केली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली, तर अवैध दारू ववाळू वाहतुकीवरही कारवाई करण्यात आली. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांच्याकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. १६९ वाहनांची तपासणी करून ५९ वाहनांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये ओव्हरलोड, विना परवाना वाहतूक, विना-झणउ, रिफ्लेक्टर नसणे, सीटबेल्ट न लावणेतसेच विना-HSRP नंबर प्लेट आदी नियम भंगाचा समावेश आहे. या कारवाईत जागेवर ५ लाख ६ हजार ५०० रुपयांचारोख दंडवसूल करण्यात आला. तसेच प्रलंबित ई-चलानपोटी ८१ हजार रुपयांचा दंड बजावण्यात आला. त्यामुळे एकूण ५ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू निर्मिती व वाहतुकी विरोधात विविध ठिकाणी छापे टाकून ९ गुन्हे दाखल करत ९ आरोपींना अटक केली. या कारवाईत ४६.४४ लिटर अवैध देशी दारू, ४५ लिटर हात भट्टी दारू आणि २०० लिटर रसायन असा मुद्देमाल जप्तकरण्यात आला. जप्त मुद्दे मालाची एकूण किंमत ३६ हजार २०० रुपये आहे. महसूल विभागाने गौण खनिजाचे अवैध उत्खनन ववाहतूक रोखण्यासाठी तपासणी नाक्यांवर कारवाई केली. भोकरदन तालुक्यातील राजूर नाका येथे वाळूची अवैध वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर एक ब्रास वाळूसह पकडण्यात आला. जिल्ह्यात शांतताव सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस विभागाकडूनही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये ३६ जणांवर तर कलम १२९ अन्वये ७ जणांवर, तर इतर कायद्यांतर्गत एका व्यक्तीवर कारवाई करण्यात आली. एकूण ४४ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक खटले दाखल करण्यात आले. जिल्ह्यात अवैध वाहतूक, दारू विक्री तसेचइतर बेकायदेशीर कृत्यां विरोधातया पुढेही धडक कारवाई सुरू राहणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जादुई नंबरप्लेट RTO चा दणका

पिंपरी चिंचवड: अलीकडेच सोशल मीडियावर मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर टेक्नॉलॉजी वापरून आरटीओ पोलिसांच्या कॅमेऱ्यांना गुंगारा देणाऱ्या ड्रायव्हरवर कारवाई केली आहे. टोयोटा फॉर्च्युनर एसयुव्ही कार चालकाच्या विरोधात ट्रॅफिक पोलिसांनी आता गुन्हा दाखल करत आता ड्रायव्हरवर कारवाई केली आहे. हायटेक टेक्नोलॉजीचा वापर करून त्या ड्रायव्हरने त्याच्या कारची नंबरप्लेट लपवली होती. त्याच आधारावर आरटीओ पोलिसांनी त्या कार चालकावर (पान ३ वर)

# विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण : डॉ. विद्या पटवारी

जालना/प्रतिनिधी : माय भारत जालना, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार व श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत यंग लीडर डायलॉग (VBYLD) क्विझ स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या स्पर्धेला महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना येथील मयूरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. विद्या पटं, जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव, उपप्राचार्य पूजा कक्कड, कार्यक्रम अधिकारी प्रा. पार्वती देशमुख तसेच डॉ. सुधाकर वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा. डॉ. विद्या पटवारी यांनी विद्यार्थ्यांना विकसित भारत यंग लीडर डायलॉग (VBYLD) उपक्रमाची माहिती दिली. देशाच्या विकास प्रक्रियेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, युवकांमध्ये नेतृत्वगुण, ज्ञान, निर्णयक्षमता आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मयूरकुमार गोरमे यांनी स्पर्धेचे महत्त्व स्पष्ट करताना युवकांनी अशा उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांनी आपल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा आणि कल्पनाशक्तीचा सकारात्मक उपयोग करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. क्विझ स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत विविध प्रश्नांची उत्तरे दिली. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानासोबतच देशाच्या इतिहास, संस्कृती, विज्ञान, अर्थव्यवस्था आणि विकासविषयक बाबींच्या ज्ञानाला चालना मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# प्लास्टिक विरोधात धडक कारवाई


ठाणे : शहरातील विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईत सुमारे ९९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, तब्बल ७९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. शहरभर तपासणी मोहिमेला वेग प्लास्टिकमुळे निर्माण होणारा कचरा, नाले तुंबणे आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन महापालिकेकडून प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात वेळोवेळी कारवाई केली जाते.

# स्वाधार योजना, शासकीय वसतिगृह प्रवेशात बनावट कागदपत्रे आढळल्यास कारवाई

जालना : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना तसेच शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्याच्या उद्देशाने काही विद्यार्थी खोटी, बनावट अथवा फेरफार केलेली कागदपत्रे सादर करीत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अर्जांची आणि प्रकरणांची सखोल तपासणी करण्यात येणार असून, कागदपत्रे बनावट अथवा खोटी आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी बनावट भाडेकरारनामा, खोटे बोनाफाईड प्रमाणपत्र, बनावट वसतिगृह प्रमाणपत्र, खोटी उपस्थिती, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र किंवा इतर आवश्यक कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज अथवा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याने यापूर्वी स्वाधार योजनेचा किंवा शासकीय वसतिगृहाचा लाभ घेतला असल्यास तो लाभ नियमानुसार रद्द करून शासनाकडून अदा करण्यात आलेली रक्कम वसूल केली जाणार आहे. प्रकरणाच्या स्वरूपानुसार संबंधितांविरुद्ध लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाईही करण्यात येईल. स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरताना इंटरनेट कॅफे अथवा ऑनलाइन सेवा केंद्र चालकांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, कागदपत्रांमध्ये फेरफार करणे, खोटी माहिती अपलोड करणे, बनावट प्रमाणपत्रे तयार करून देणे किंवा विद्यार्थ्यांना शासनाची फसवणूक करण्यास जाणीवपूर्वक मदत करणे आढळल्यास संबंधित कॅफे चालक, मालक किंवा व्यक्तीविरुद्धही नियमानुसार कठोर कायदेशीर आणि फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय अशा गैरप्रकारात कोणतीही व्यक्ती, संस्था, महाविद्यालयीन अधिकारी किंवा कर्मचारी अथवा इतर संबंधित व्यक्ती सहभागी असल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्यास, त्यांच्या भूमिकेनुसार संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. स्वाधार योजना आणि शासकीय वसतिगृहाच्या योजनांचा लाभ केवळ पात्र विद्यार्थ्यांनाच शासनाच्या नियमानुसार मिळावा, यासाठी प्राप्त अर्ज आणि कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अर्ज करताना केवळ खरी, वैध आणि अधिकृत कागदपत्रेच सादर करावीत. बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्या व्यक्तींच्या आमिषाला बळी पडू नये आणि शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. बनावट कागदपत्रे सादर करणारे विद्यार्थी तसेच अशा गैरप्रकारास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहाय्य करणाऱ्या व्यक्तींवर कोणतीही दयामाया न दाखविता नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संबंधित विभागाकडून देण्यात आला आहे.

# आमची अंगणवाडी आमची जबाबदारी या संकल्पनेवर आधारित ९ व्या राष्ट्रीय पोषण माहचे आयोजन

जालना/प्रतिनिधी: महिला व बाल विकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) आणि जिल्हा परिषद, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात‘राष्ट्रीय पोषण माह २०२६’अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘सुपोषित बालक, निरोगी माता आणि सक्षम समाज’ हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असून यंदा‘आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी’या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ. कृष्ण कांत कनवरीयायांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल विकास, शिक्षण आणि आरोग्य विभागाच्या समन्वयातून जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत अंगणवाडी व्यवस्थापन समित्या अधिक सक्रिय करून अंगणवाडी केंद्रांमधील स्वच्छता, आहाराचा दर्जा आणि स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, ३ ते ३० वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडी सेविकांमार्फत नियोजनबद्ध गृहभेटी घेऊन पालकांना बालसंगोपन, आरोग्य आणि पोषणाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. बालकांच्या आहारात पुरेशा प्रथिनांचा समावेश, विविध अन्नगटांचा वापर आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध पौष्टिक अन्नपदार्थांचा वापर याबाबत जनजागृती केली जाणार आहे. पूरक पोषण



आहार कार्यक्रमांतर्गत ताजे, विविध प्रकारचे व गरम शिजवलेले भोजन उपलब्ध करून देण्याबरोबरच साप्ताहिक मेनूमध्ये विविधता, स्वच्छता आणि आहाराच्या गुणवत्तेची हमी यावर विशेष भर देण्यात येणार आहे. नव्याने गठित अंगणवाडी व्यवस्थापन समित्या तसेचड्छझ मेनू बोर्डयांच्या माध्यमातून पोषणविषयक उपक्रमांमध्ये समुदायाचा सहभाग, मालकीभाव आणि उत्तरदायित्व वाढविण्यात येणार आहे. प्रारंभिक बाल संगोपन व शिक्षण (एउउए) कार्यक्रमांतर्गत बालकांचा संज्ञानात्मक विकास आणि पुरेसे पोषण हे परस्परपूरक घटक असल्याचे अधोरेखित करण्यात येणार आहे. मातृ वंदना योजनेची विशेष मोहीम प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गतपात्र महिलांना योजनेचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी विशेष कागदपत्र पूर्तता व नोंदणी मोहीम राबविण्यात येणार आहे. यासोबतच महिला मेळावे, माताबैठका, रॅली, पथनाट्य, गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला व रांगोळी स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीतही पोषण, आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय पोषण माह अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, लोकप्रतिनिधी, स्वयं-सहायता बचत गट तसेच पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ. कृष्ण कांत कनवारीयायांनी केले आहे.

# रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र; २०२६ अतंर्गत आयोजीत रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन

जालना/प्रतिनिधी : देशातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने‘रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६’या राज्यव्यापी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभर एकाच दिवशी ८०० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. जालना जिल्ह्यातील रोजगार महाकुंभाचे आयोजन२९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), जालना येथील वर्कशॉप क्रमांक २ मध्येकरण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात दहावी व बारावी उत्तीर्ण उमेदवार, कला, वाणिज्य व विज्ञांन शाखेतील पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार, डिप्लोमा व अभियांत्रिकी पदवीधारक, अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थी आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या पात्र युवक-युवतींना सहभागी होता येणार आहे. विविध खासगी आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पात्र उमेदवारांसाठी २१ ते २४ सप्टेंबर २०२६ यां कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे दोन सत्रांमध्ये रोजगारपूर्व तयारी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिलेल्या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या सर्व उमेदवारांनी २९सप्टेंबर रोजी आयोजित रोजगार मेळाव्यास उपस्थित राहावे, जेणेकरून त्यांना विविध आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालनाए. ए. केसकरतसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील प्राचार्यए. ए. आलटेयांनी केले आहे.